# एकमेकांवरील प्रीती कशी दाखवावी हे येशू व त्याच्या शिष्यांनी प्रकट केले

**मुलांना शिकवणाऱ्यांनी C5b हा अभ्यास वाचावा.**

## 1. विश्वासणाऱ्यांना उपासकांच्या 'शरीररुपी जीवनाचा' आनंद घेण्यासाठी मदत करण्याकरीता आपल्या मनाची तयारी करा

तुमच्या मंडळीला 'ख्रिस्ताचे मंडळीरूपी शरीर' असे म्हणतात, कारण...


येशू शरीराचे मस्तक आहे, इफिस 5:23

काही विश्वासणाऱ्यांना आत्मे ओळखण्याचे कृपादान मिळते, ते आमचे नेत्र आहेत, 1 करिंथ 12:10

काही जणांना शिक्षण देण्याचे आध्यात्मिक कृपादान मिळते, ते शरीराचे मुख आहेत, इफिस 4:11-12

पवित्र आत्मा सर्व विश्वासणाऱ्यांना ख्रिस्ताच्या विश्वव्यापी शरीरामध्ये जागा देतो, 1 करिंथ 12:13,27.


सेवा करण्याचे आध्यात्मिक कृपादान असणारे आमचे हात आहेत, 1 करिंथ 12:5./सुवार्ता प्रसार करण्याचे व प्रेषित होण्याचे कृपादान मिळालेले हे **पाय** आहेत, ते दुर्लक्षित लोकांकडे सुवार्ता घेऊन जातात, रोम 10:15, इफिस 6:15



इफिस 4:11-16 वाचा आणि आमच्या कृपादानांचे काय परिणाम व्हावेत अशी देवाची इच्छा आहे हे पाहा.

- समजा, एखाद्याने शिकवण्याच्या कृपादानाचा योग्य प्रकारे उपयोग केला तर त्याचे परिणाम काय होतील? (वचने 11 व 12)
- समजा, शिक्षक केवळ माहितीच पुरवत असेल तर मग शरीररुपी मंडळीची देवाच्या इच्छेनुसार उन्नती करण्यास विश्वासणाऱ्यांचे साहाय्य करण्यात तो अपयशी ठरतो. प्रत्येकाने आपआपले सेवाकार्य करावे यामागे देवाचा अंतिम हेतू काय आहे? (वचन 13)
- आमच्या सेवेच्या कार्यांचा परिणाम आम्ही ख्रिस्ताची उंची गाठण्यात व्हावा हा देवाचा उद्देश आहे, पण एखादा यात अपयशी ठरला तर शरीररूपी मंडळीचे काय होईल? (वचन 14)
- कायम नव्या गोष्टींच्या मागे धावणाऱ्या लहान बालकासारखे न राहता विश्वासणाऱ्यांनी एकत्रितपणे, जसे आपल्या शरीराचे विविध अवयव एकमेकांची सेवा करतात तसे कार्य केले पाहिजे. शरीरातील कार्याचा समन्वय कोण साधते? (वचने 15 व 16).

विश्वासणाऱ्यांनी ख्रिस्ताच्या समन्वयाने एकमेकांची सेवा करण्यासाठी स्वत:ची तयारी करणे अगत्याचे आहे. रोमकरांस पत्राचा 12 वा अध्याय वाचा आणि नव्या करारात वर्णन केल्या प्रमाणे त्यांनी सेवा करण्यासाठी स्वत:ची तयारी कशी करता येईल ते पाहा.



- विश्वासणाऱ्यांनी त्यांची कृपादाने योग्य रितीने वापरावीत याकरीता त्यांनी कोणत्या गोष्टीचे देवाला रूपांतर करु दिले पाहिजे? (वचन 2).
- एकमेकांची सेवा करण्यासाठी 'एकमेंकांसाठीच्या' आज्ञांचे प्रत्यक्षात पालन करा.

- नव्या करारामध्ये 'एकमेकांची' सेवा करा अशी आज्ञा देवाने विश्वासणाऱ्यांना पन्नासहून अधिक वेळा दिलेली आहे. ही सेवा विविध मार्गांनी करायची आहे. जसे शिक्षण देणे, एकमेकांना आधार देऊन सांत्वन करणे, एकमेकांची ओझी वाहणे, एकमेकांना बोध करुन क्षमा करणे, आपले अपराध-चुका एकमेकांजवळ कबूल करणे इत्यादी.
- पुढे दोन गट दिले आहेत. डाव्या गटात उदाहरणे दिली आहेत तर उजव्या गटात 'एकमेकांबद्दलच्या' आज्ञा आहेत. त्यांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| **अ) उत्पत्ती 33:1-10 याकोबाने त्यांच्या वडीलांकडून आशीर्वाद चोरुन घेतल्यावर अनेक वर्षांनी एसावाने आपल्याभावाला ठार करण्याचा विचार केला.** | **एकमेकांना शिकवा रोम14:14, कलस्सै 3:16** |
| **ब) नहेम्या 4:16-21 बाबिलोनच्या बंदिवासातून परत आलेल्या यहूद्यांनी यरुशलेमेचे कोट पुन्हा बांधून काढले.** | **एकमेकांबरोबर काम करा, 1 करिंथ 3:9, 2 करिंथ 6:1** |
| **क) प्रे.कृ. 18:24-28** | **एकमेकांसाठी प्रार्थना करा, याकोब 5:16** |
| **ड) कलस्सै 1:1-4 व 4:2-4** | **एकमेकांना क्षमा करा इफिस 3:13, 4:32, कलस्सै 3:13** |

*[उत्तरे : (अ) क्षमा करा. (ब) काम करा. (क) शिकवा. (ड) प्रार्थना करा]*

- देवाच्या कुटुंबात एकमेकांची सेवा करणे C4e ह्या शीर्षकांतर्गत पौल तिमथी पुढाऱ्यांचे प्रशिक्षण मध्ये 'एकमेकांसंबंधीच्या' पन्नासहून अधिक आज्ञांची यादी दिलेली आहे.

**2. विश्वासणाऱ्यांना आठवडयामध्ये एकमेकांची सेवा कशा प्रकारे करता येईल याची योजना आखा.**

लोकांच्या गरजा व स्थानिक रीतीरिवाज यानुसार कार्यक्रम निवडा. उदाहरणार्थ:

- प्रार्थना, मार्गदर्शन व सेवा करणे यासाठी एकमेकांच्या घरी जा.
- तुमच्या घरातील इतरांना आदराने वागवा, काही जणांनी नकळत देवदूतांचाही पाहुणचार केला (इब्री 13:2)
- समाजाला उपयुक्त ठरतील असे प्रकल्प हाती घ्या.
- उपासना संपल्यावर तरुणांना गीते गाण्यासाठी तसेच वचनावर चर्चा करण्याकरीता वेळ राखून ठेवा.
- आजारी किंवा दु:खी लोकांना भेटा व प्रार्थना करा.
- नातेसंबंध दृढ करण्यासाठी लोकांना चहा-पाण्याचे, जेवणाचे आमंत्रण द्या.
- लोकांना सहलीला किंवा ट्रेकिंगला घेऊन जा.
- मैदानी खेळांचे किंवा बैठया खेळांचे विशेषत: तरुणांसाठी आयोजन करा.
- लोकांना त्यांची घरे दुरुस्त करण्यास वा इतर गरजा पुरवण्यास साहाय्य करा.

**3. उपासनेमध्ये विश्वासणाऱ्यांना एकमेकांची सेवा करण्यास साहाय्य करा.**

उपासनेमध्ये अनेक प्रकारे एकमेकांची सेवा करता येते. यासाठी आपल्याला लोकांना मदत करता येईल. तुमचा गट आणि लोकांची पार्श्वभूमि ह्यांना अनुरूप असेच मार्ग उपयोगात आणा. पुढील उदाहरणांचा विचारा करा:

- दोन वा तीन जणांचा गट तयार करा. त्यांना एकमेकांसाठी प्रार्थना, मार्गदर्शन करु द्या, त्यांनी एकत्रितपणे आपल्या कामाची आखणी करावी आणि एकमेकांना ख्रिस्ताची सेवा करण्यासाठी साहाय्य करा.

- काही मंडळयांमध्ये त्यांचे लहान-लहान गट आठवडयामध्ये वेगवेगळया वेळी एकत्र येतात. यामुळे सर्वांना यात सहभागी होता येते. काही ठिकाणी आठवडयातून एकदाच दीर्घ सभा होते. अशा परिस्थितीत, त्यांनी लहान गटांना एकत्र येण्यास वेळ दिला पाहिजे. मुख्य उपासनेच्या वेळी विश्वासणाूयांनी त्यांना ख्रिस्ताची ओळख कशी झाली याची साक्ष देणे अगत्याचे आहे. आरोग्य मिळाले असेल तर त्याबद्दल सांगावे तसेच मंडळीला रस वाटेल-उद्बोधक ठरतील अशा इतर गोष्टीही सांगाव्यात.

**4. तुमच्या सहकाूयांशी चर्चा करुन येणाूया उपासना सभेविषयी योजना आखा.**

भाग 1 चा अभ्यास करीत असताना तुम्ही पवित्र शास्त्रातून काय शिकलात ते स्पष्ट करा:

- आपल्याला 'ख्रिस्ताचे शरीर' असे का म्हटले आहे?
- देवाला सर्व सेवाकार्यांपासून अपेक्षित अशा कोणत्या परिणामांविषयी इफिस 4:11-16 ही वचने सांगतात.
- देवाला आमच्या मनांचे रूपांतर करु देण्यास संधी देऊन प्रीतीच्या सेवेसाठी तयार असण्याची आवश्यकता (रोम 12:1-2).
- आपण एकमेकांची सेवा करीत असताना 'एकमेकांमधील' संवादाची देवाला आवश्यकता असते.

**मुलांनी** तयार केलेली नाटिका त्यांना सादर करण्यास आणि नंतर प्रौढांना त्याविषयी प्रश्न विचारण्यास सांगा.

**पाठ करा** योहान 13:34.

तुम्ही आठवडयामध्ये आखलेल्या कार्यक्रमांची घोषणा तयारी करा.

प्रभुभोजनाची ओळख करुन देण्यासाठी, येशूने त्याच्या मृत्यूपूर्वीच्या शेवटच्या रात्री आपल्या शिष्यांसमवेत घेतलेल्या अत्यंत जवळकीच्या आपुलकीच्या सहभगितेविषयी स्पष्टीकरण करा. ते जुन्या करारातील अत्यंत पवित्र मानल्या गेलेल्या अशा यहूदी वल्हांडणाच्या सणाचे भोजन करीत होते. हाच सण आपण आता प्रभुभोजनाच्या रूपाने साजरा करतो.

दोन वा तीन जनांच्या गटांत एकमेकांना मदत करा. त्यांनी एकमेकांसाठी प्रार्थना करुन उत्तेजन द्यावे आणि आपल्या योजनांना अंतिम रूप द्यावे.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net